# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### चंद्रपूर जिल्हयातील सावली येथे अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतीगृहास मंजूरी मिळण्याबाबत

**(१) ३९८०४ (२९-०४-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील सावली तालुक्यात आदिवासी विकास विभागाच्यावतीने अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलीकरीता वसतीगृह नसल्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागत असल्यामुळे सावली येथे मुलांचे आणि मुलींचे दोन स्वतंत्र वसतीगृह मंजूर करून बांधकामास निधी उपलब्ध करून दयावे या करीता लोकप्रतिनिधीनी पत्र क्र.विव/ब्रम्ह/१०२१/२०१६ अन्वये मा.आदिवासी विकास मंत्री, सचिव, आदिवासी विकास विभाग, यांना दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९२ मध्ये निर्मिती झालेल्या सावली तालुका येथे आदिवासी विकास विभागाच्या वतीने अनुसूचित जमातीच्या मुलांचे आणि मुलीकरीता स्वतंत्र दोन वसतीगृह मंजूर करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, सदर वसतीगृह इमारतीचे बांधकाम करण्यासाठी निधीची तरतुद करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (११-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) वसतींगृहासाठी शहरामध्ये जागा मिळविणे, बांधकाम करणे, त्याची देखभाल दुरुस्ती, तसेच भाड्याच्या इमारतीसाठी भाड्याची रक्कम देणे, वसतीगृहाच्या व्यवस्थापनासाठी कर्मचारी नियुक्ती व त्यांचे वेतन व भत्ते अशा प्रकारचे शासनाचे खर्च कमी करण्यासाठी नवीन वसतीगृह मंजूर करण्याऐवजी वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घेण्यासाठी थेट रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्याबाबत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना सुरू करण्यात आलेली आहे.

सन २०१८-१९ पासून सदर योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील कृषि पंप जोडणीची सुमारे ३० हजार प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(२) ४३७६४ (२०-०४-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील कृषि पंपाना विदयूत जोडणीची सुमारे ३० हजार प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी पंपाना विदयुत जोडण्या देण्याची प्रकरणे प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास सदर कृषी पंपाना तातडीने विद्युत जोडण्या देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०६-२०१८) :** (१), (२) व (३) अहमदनगर मंडळांतर्गत मार्च, २०१५ अखेर कृषिपंप वीज जोडणीसाठी पैसे भरुन ४९५३ अर्ज प्रलंबित होते. त्यापैकी माहे एप्रिल, २०१५ ते मार्च, २०१६ पर्यंत ११०७ इतक्या कृषिपंपांना विद्युत जोडण्या देण्यात आल्या आहेत. तसेच, मार्च, २०१६ अखेर शेती पंपांचे ६७०२ अर्ज पैसे भरुन प्रलंबित होते. त्यापैकी माहे एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ पर्यंत २८४९ इतक्या कृषिपंपाना विद्युत जोडण्या देण्यात आल्या आहेत. मार्च, २०१७ अखेर ११३६५ इतके अर्ज पैसे भरुन प्रलंबित आहेत. एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ अखेर ३३५६ इतक्या कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले असून मार्च, २०१८ अखेर १३२७७ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत. सदर कृषिपंपाना नवीन उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे जोडणी देण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वीज जोडणी नसलेल्या घरांना जोडणी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३) ४४२८५ (२३-०४-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे१९ लाख गावांना केंद्र शासनाने दिन दयाल उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत वीज जोडणी देण्या दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचे स्वरुप काय आहे व त्यानुसार केंद्र व राज्य शासन आणि महावितरणमार्फत एकुण किती निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,
(३) असल्यास, किती निश्चित कालावधीपर्यंत १९ लाख गावांन वीज जोडणी देण्यात येणार आहे वा देण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०६-२०१८) :** (१) व (२) केंद्र शासनाकडून राज्याकरिता पं.दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेतंर्गत रु. २१५२.६८ कोटी रकमेच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी ६०% रक्कम केंद्र सरकार अनुदान स्वरुपात देणार आहे. ४०% रक्कम महावितरण कर्ज स्वरुपात घेणार आहे.
सदर योजनेमध्ये महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण भागातील ३०,१७६ गावामधील १२,४८,४७४ घरगुती ग्राहकांना नवीन वीज जोडणी देण्यासाठी पायाभूत सुविधा उभारणी करणे, तसेच सदर घरगुती ग्राहकांपैकी ३,९४,१४१ दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना नवीन वीज जोडणी देणे, ८३७ वाहिन्यांचे वाहिनी विलगीकरण करणे, वीज वितरण प्रणाली सक्षमीकरण करणे,सांसद आदर्श ग्रामयोजनेच्या ६९ गावांमध्ये वीजवितरण प्रणालीचे सक्षमीकरण करणे इ. कामांचा समावेश आहे. त्यासाठी २१५ नवीन उपकेंद्रे, १०० उपकेंद्रांची रोहित्र क्षमतावाढ, १०९२४ वितरण रोहित्रे, १९४१७ किमी उच्चदाब वाहिनी, ६२१८.४ कि.मी लघुदाब वाहिनी उभारणे इ. कामे करण्यात येणार आहेत.
(३) सदर योजनेची नमूद केलेली कामे, कामाचे आदेश (LOA) दिल्यानंतर दोन वर्षामध्ये पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या निवास व भोजनाची व्यवस्था करण्याबाबत

**(४) ४५४७६ (२९-०४-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या निवास व भोजनाची व्यवस्था होणे गरजेचे असल्याने १०० मुलींचे व १०० मुलांचे वसतिगृह मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोनती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता राज्यात एकूण ४९१ शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत. सदर वसतीगृहांची प्रवेश क्षमता ५८४९५ इतकी आहे. मागील तीन शैक्षणिक वर्षात वसतीगृह प्रवेशासाठी उपलब्ध क्षमतेपेक्षा अतिरिक्त मागणी पाहता आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडून कार्यरत असलेल्या शासकीय वसतीगृहांची साधारणत: २०,००० विद्यार्थी क्षमता वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता.

तथापि, वाढीव क्षमतेकरीता वसतीगृह बांधकामास जागा मिळविणे, वसतीगृह बांधकाम करणे किंवा इमारत भाड्याने उपलब्ध करणे, वसतीगृहाच्या व्यवस्थापनासाठी कर्मचारी नियुक्ती इ.करीता लागणारा विलंब व भांडवली खर्च टाळून शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (DBT) धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट रक्कम जमा करण्याबाबत मंत्रीमंडळाच्या मान्यतेने दि.१५.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना सुरू करण्यात आलेली आहे.

---

**श्री.मंगलपुरी नागरीक सेवा सहकारी संस्था मर्या. अमरावती यांनी आदिवासी मुलांचे भोजन कंत्राट बेकायदेशीररीत्या रद्द केल्याबाबत**

**(५) ४९६३५ (२९-०४-२०१६). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री.मंगलपुरी नागरीक सेवा सहकारी संस्था मर्या. अमरावती यांनी आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह क्र.३ अकोली अमरावती येथील भोजन कंत्राट बेकायदेशीररीत्या रद्द केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकशी समिती नियुक्त केली मात्र अजूनपर्यंत चौकशी पूर्ण केली नाही म्हणून लोकप्रतिनिधी यांनी प्रकल्प अधिकारी धारणी यांना विचारणा केली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी विभागाचे अपर आयुक्त हे प्रभारी असल्याने चौकशी होत नाही व त्यामुळे अधिकारी कामचूकारपणा करतात, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०६-२०१८) :** (१) श्री.मंगलमुर्ती नागरीक सेवा सहकारी संस्था मर्या. अमरावती या भोजन ठेकेदाराकडून वसतीगृहातील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे जेवणाबाबत विद्यार्थ्यांकडून तक्रारी प्राप्त होत्या. त्यानुषंगाने भोजनात सुधारणा करण्याबाबत वारंवार कळवूनही सुधारणा न केल्याने सदर भोजनठेका रद्द करण्यात आला.
(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांची समिती गठीत करून चौकशी करण्यात आली. सदर चौकशी अहवालातील अभिप्रायानुसार संबंधित वसतीगृहाचे गृहपाल काही अंशी दोषी आढळल्याने त्यांची एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

---

**पनवेल महानगरपालिकेने सार्वजनिक विद्युत सबस्टेशनच्या वापरासाठी असलेला भूखंडाचा बेकायदा वापर केल्याबाबत**

**(६) ६५४६७ (२७-०१-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिकेने (रायगड), सार्वजनिक विद्युत सबस्टेशनच्या वापरासाठी, महावितरणसाठी ठेवलेला राखीव भूखंड क्रं.४५८, ४५९, ४९१, ४९५ खासगी गृहसंकुलाकरिता बेकायदा हस्तांतरित केल्याप्रकरणाच्या अहवालावर महावितरण कंपनीस्तरावर माहे जुलै २०१६ पासून सुरु असलेली छाननीची कार्यवाही अद्याप शासनाने पूर्ण केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर प्रकरणी छाननीची कार्यवाही विनाविलंब पूर्ण करुन यातील दोषी अधिकारी आणि कंत्राटदार यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०६-२०१८) :** (१) महावितरण कंपनी मार्फत चौकशी सुरू आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात गत साडेसहा वर्षात विजेच्या धक्क्याने महावितरण कर्मचाऱ्यांसह सुमारे ५ हजार जणांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(७) ६५९३१ (१०-०१-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विजेच्या धक्क्याने गत साडेसहा वर्षात महावितरण कर्मचाऱ्यांसह सुमारे ५ हजार जणांना प्राण गमवावे लागल्याची तसेच सुमारे साडे तीन हजार जण जखमी झाले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती महावितरण कर्मचारी व सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत तसेच त्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना हाती घेतल्या आहेत तसेच त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) होय. मुख्य विद्युत निरीक्षक यांच्यामार्फत प्रत्येक प्रकरणाची चौकशी केली जाते.
(३) सर्व वितरण कंपन्यांच्या अपघातप्रवण वीजसंच मांडण्यांचे सर्वेक्षण करण्यात येत असून अपघातप्रवण वीजसंच मांडण्या सुरक्षित करुन घेण्यासाठी वितरण कंपनीकडे मुख्य विद्युत निरीक्षक यांच्यामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

कर्मचारी व सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत महावितरण व मुख्य विद्युत निरिक्षक, मुंबई यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या व घेत असलेल्या ठोस उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत.

१) कर्मचाऱ्यांकरिता विद्युत सुरक्षेविषयी प्रशिक्षण देण्यात येते.

२) विद्युत सुरक्षेविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रबोधन मेळावे आयोजित करण्यात येतात. तसेच नागरिकांच्या विद्युत सुरक्षिततेबाबतच्या जागृतीसाठी दरवर्षी विद्युत सुरक्षा सप्ताह आयोजित केले जातात

३) शाळा, महाविद्यालय, तंत्रनिकेतन, आय.टी.आय इत्यादी ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन सुरक्षाविषयी मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

४) ११ जानेवारी ते १७ जानेवारी, २०१६ व सन २०१७ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या विद्युत सुरक्षा सप्ताहा दरम्याने विद्युत निरीक्षक कार्यालय व महावितरण यांचे संयुक्त विद्यमाने सुरक्षा विषयी जनसामान्यांना व कर्मचाऱ्यांना जागरुक करण्याच्या दृष्टीने व अपघातांचे प्रमाण कमी व्हावे या सामाजिक भावनेने विविध उपक्रम राबविण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खरीप हंगामातील सन २०१५-१६ मधील दुष्काळसदृश्य ३६३ गावातील विद्युत पायाभूत सुविधांसाठी निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत**

**(८) ६८३७३ (१०-०१-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खरीप हंगामातील सन २०१५-१६ मधील दुष्काळसदृश्य ३६३ गावातील विद्युत पायाभूत सुविधांसाठी शासनाने २३ कोटी ४१ लाख रूपये खर्च करण्याचा निर्णय नुकताच माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयांतर्गत दुष्काळी भागात विद्युत प्रणालीचे सक्षमीकरण, नुतनीकरण आणि आधुनिकीकरणासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत किती निविदा शासनास प्राप्त झाल्या आहेत,
(४) तसेच उक्त निर्णयानुसार कोणकोणत्या गावांचा यात समावेश करण्यात आला आहे,
(५) सदर प्रकियेवर केव्हापर्यंत अंमलबजावणी करण्यात येणार आहे वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) राज्यातील पैसे भरुन वीज जोडणीकरिता पंपाना उच्चदाब वितरण प्रणाली (HVDS) व्दारे वीज पुरवठा करण्याच्या योजनेस शासनाने मंजुरी दिली असून याबाबतची निविदा प्रक्रिया महावितरण कंपनीमार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे येथील मोहाडी उपनगर येथील गट नं.११५/५ येथील शेतक-यांना विद्युत पुरवठा होत नसल्याबाबत**

**(९) ७४५०२ (२८-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील मोहाडी उपनगर येथील गट नं.११५/५ येथील शेतक-यांना विद्युत पुरवठा होत नसल्यामुळे त्यांची गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर,२०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गट नं.११५/५ येथे नविन ट्रान्सफॉर्मर बसवून शेतक-यांची गैरसोय दूर करावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी शहर/ग्रामीण यांना दिनांक २९ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास पत्र देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पत्राची दखल घेऊन शासनाने सदर ठिकाणी त्वरीत नविन ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सदर पत्राच्या अनुषंगाने महावितरण अधिकाऱ्यांनी गट नं. ११५/५ चे सर्वेक्षण केले असता तेथील रोहित्रामधून वीज पुरवठा सुरळीत होत असल्याचे दिसून आले. हया रोहित्राची स्थापित क्षमता २०० के.व्ही.ए. आहे. सन २०११ मध्ये सदर रोहित्राची क्षमतावाढ १०० के.व्ही.ए. वरुन २०० के.व्ही.ए. पर्यंत करण्यात आली आहे. या रोहित्रावरील काही वीजभार मोहाडी उपनगरामधील रोहित्रावर स्थलांतरीत करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर रोहित्रावर क्षमतेपेक्षा कमी वीज भार आहे व हे रोहित्र अतिभारीत नसल्यामुळे नवीन रोहित्राची आवश्यकता नसल्याचे मा. लोकप्रतिनिधींना अवगत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आम्रपाली एज्यूकेशन सोसायटी, मुंबई ही संस्था कोटयावधी रुपयांच्या रकमेची शिष्यवृत्ती खोटी कागदपत्रे सादर करुन मिळवत असल्याबाबत**

**(१०) ७४५५८ (२८-०४-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आम्रपाली एज्यूकेशन सोसायटी, मुंबई या संस्थेला विरेवाडी (ता.डहाणू जि.पालघर) या ठिकाणी शासनाच्या तीन वर्षे कृषी तंत्रनिकेतन अभ्यासक्रम चालु करण्याकरीता अधिकृत मान्यता नसतानाही एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकारी, डहाणू (जि.पालघर) या कार्यालयाला बनावट पात्रता पत्र सादर करुन सन २०१२-१३ पासून आजपर्यंत सदर संस्था कोटयावधी रुपयांच्या रकमेची शिष्यवृत्ती खोटी कागदपत्रे सादर करुन मिळवत असल्याची बाब उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालिन कुलगुरु किसन लवांदे, तत्कालिन शिक्षण संचालक डॉ.चंद्रमोहन भांबुरे यांनी सदर संस्थेला बेकायदेशीर मान्यता देणे, तत्कालिन कृषी मंत्री यांनी संबंधीत संस्थेला देण्यात आलेली बोगस मान्यता रद्द करण्याचे दिलेले आदेश, उच्च न्यायालयाने नियम व निकषांची पुर्तता तपासून दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाला मान्यता देणेबाबत विचार करा असा आदेश देऊनही तीन वर्षाच्या अभ्यासक्रमाला संबंधीत शिक्षण संस्थेला मान्यता देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधितांकडे या संस्थेला बेकायदेशीर मान्यता दिल्यापासून आजपर्यंत शेकडो तक्रारी करण्यात आल्या असून व तत्कालिन कृषी मंत्री यांनी दिलेल्या बनावट मान्यता रद्द करण्याबाबत दिलेला लेखी झुगारुन आम्रपाली एज्यूकेशन सोसायटीला देण्यात येत असलेली लाखो रुपयांची शिष्यवृत्ती व त्याद्वारे सुरु असलेला गैरव्यवहार याविरुध्द कोणतीच कारवाई न करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) मा.कृ.वि. अधिनियम, १९८३ मधील कलम ४१ अन्वये असलेल्या अधिकारान्वये कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परीषदेने आम्रपाली एज्यूकेशन सोसायटी, मुंबई या संस्थेला विरेवाडी (ता.डहाणू, जि.पालघर) या ठिकाणी शासनाच्या तीन वर्षे कृषी तंत्रनिकेतन अभ्यासक्रम चालू करण्याकरीता दि. २३.०५.२०११ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली.

तथापी महाराष्ट्र कृषी व संशोधन परिषद, पुणे यांनी दि.१२.०७.२०१२ रोजी सदर मान्यता रद्द केली. या विरोधात मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिके मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.१०.०८.२०१२ रोजीच्या आदेशान्वये कृषी परिषदेचे दि.१२.०७.२०१२ चे आदेश रद्द केले.

त्यामुळे कृषी परिषदेने त्यांच्या दि.२३.०८.२०१२ च्या पत्रान्वये कृषी तंत्र पदविका अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी प्रवेशित करण्यास मान्यता दिली आहे.

त्यानुसार सदर महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क/परिक्षा शुल्क अदा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विविध कारणांमुळे दरवर्षी शेतमालाचे दर कमी होत असल्याबाबत**

**(११) ७४७२७ (२८-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नापिकी, अवकाळी पाऊस व दुष्काळामुळे दरवर्षी शेतमालाचे दर कमी होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे विटाई (ता.साक्री जि.धुळे) येथील शेतक-यांनी शासनाने शेतमालाला हमीभाव द्यावा किंवा शेतक-यांना इच्छामरणाची परवानगी द्यावी, अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने शेतक-यांना उभारी देण्यासाठी शेतक-यांचे कर्ज माफ व शेतमालाला हमीभाव देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-०६-२०१८) :** (१) नाही.
(२) होय,
श्री.दिनेश जिभाऊ खैरनार व इतर मौजे विटाई ता.साक्री, जि.धुळे यांनी इच्छामरणाची परवानगी आणि त्याला शहिदाचा दर्जा देण्याबाबतची मागणी जिल्हाधिकारी, धुळे यांचेकडे दिनांक २६/१२/२०१६ रोजी समक्ष निवेदन देऊन केली आहे.
(३) राज्यातील शेतकऱ्यांना दिनांक १/०४/२०१२ रोजी व त्यानंतर पीक कर्ज व मध्यम मुदत कर्ज घेतलेल्या कर्जापैकी दिनांक ३०/०६/२०१६ रोजी थकबाकीदार असलेल्या शेतकऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना -२०१७ अंतर्गत कर्जमाफी देण्यात आली आहे.
तसेच मूग,सोयाबीन व तूरीची खरेदी किमान आधारभूत दराने केली असून,उडीदाची खरेदी खुल्या बाजारभावाने केलेली आहे.हंगाम २०१६-१७ मध्ये केलेली खरेदी पुढीलप्रमाणे आहे:-

| | |
|---|---|
| मुग | ६७२७८.४१ क्विंटल |
| सोयाबीन | १६४२.९८ क्विंटल |
| तूर | ७४५४२६६.१६ क्विंटल |
| उडीद | १४९८०३.४६ क्विंटल |

त्याचबरोबर राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये जुलै, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये १००/- व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे रुपये ४३.४८ कोटी इतके अनुदान मंजूर करुन

वितरित केले आहे. आणि राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये ऑक्टोबर, २०१६ ते डिसेंबर, २०१६ या कालावधीमध्ये सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल २०० व जास्तीत जास्त २५ क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे रुपये १०८.६४ कोटी इतके अनुदान मंजूर करुन वितरित केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विदर्भातील ६ जिल्हयात तेंदूपत्ता लिलावात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१२) ७७६२७ (१९-०४-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील ६ जिल्हयातील १०९ गावामधील ग्राम वन समित्यांनी ई-टेंडरींग न करताच माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तेंदूपानाची विक्री केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विक्रीमुळे कोटयवधी रूपयाचे शासनाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरप्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२२-०६-२०१८) :**(१) अंशत: खरे आहे.

गोंदीया जिल्ह्यातील ३८ गावांनी ग्रामसभेच्या पातळीवर ग्रुप ऑफ ग्रामसभा असा समुह तयार करून त्या ग्रुप ऑफ ग्रामसभेच्या माध्यमातून ई टेंडरींग किंवा निविदा प्रक्रीया न राबविता ३१ गावांच्या क्षेत्रातील तेंदूपाने विक्री केलेली आहे.

(२) हे खरे नाही.

सामुहिक वन हक्क प्राप्त गावांमधील तेंदूपानाचे विक्री पोटी प्राप्त होणारी रक्कम ही तेथील तेंदूपाने संकलन करणाऱ्या मजूरांना मजूरी व बोनस स्वरूपात वितरीत करण्यात येत असते. सबब, या गावातील तेंदूपाने विक्रीमुळे शासनाचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

(३) व (४) होय.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या कलम ३ (१)(ग) नुसार गावांच्या सीमांतर्गत किंवा सीमेबाहेर पारंपारीकरीत्या गोळा केले जाणारे गौण वनोत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यासाठी अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वन निवासी यांना स्वामित्व हक्क प्राप्त झालेले आहेत. तसेच अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ च्या नियम ४(१)(ड), नियम ४(१)(च) व नियम ४(१)(छ) नुसार वन्यजीवन, वन व जैविक विविधता यांचे संरक्षण करण्यासाठी समिती गठीत करणे, सदर गठीत करण्यात आलेल्या समितीचे नियंत्रण करणे

तसेच वाहतूक, परवाना, उत्पादकांच्या विक्रीपासूनचे उत्पन्न किंवा व्यवस्थापन आराखड्यांत बदल करण्याशी संबंधित सर्व निर्णयांना मान्यता देण्याचे अधिकार ग्रामसभेचे आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कळंब (जि. यवतमाळ) येथील आदिवासी मुलांच्या वसतीगृहामध्ये रिक्त पदे आणि सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(१३) ७८४४३ (१८-०८-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि. यवतमाळ) येथे सन २००३ पासुन रासा रोडवर भाडयाच्या इमारतीमध्ये आदिवासी मुलांचे वसतीगृह प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा या विभागाकडून चालविण्यात येत असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वसतीगृहामध्ये गृहपाल वगळता लिपीक, चपराशी, चौकीदार अशी पदे रिक्त असल्याने आदिवासी मुलांना सोई सुविधा मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी मुलांसाठी नवीन इमारतीचे बांधकाम करुन येउन रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
लिपीक, चपराशी व चौकीदार ही पदे मंजूर नाहीत. तथापि, रोजंदारी कर्मचारी कार्यरत असून विद्यार्थ्यांना सर्व सुविधा मिळत आहेत.
(३) सदर वसतीगृहाच्या बांधकामाला प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नांदेड जिल्ह्यात शासनाने सोयाबीनला कमी भाव दिल्याबाबत

**(१४) ८७५४५ (१८-०८-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात सोयाबीनला शासनाने कमी भाव दिल्याचे माहे मार्च,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कापसाला ७ हजार, सोयाबीनला ५ हजार, तुरीला सात हजार भाव मिळणेबाबत शेतकऱ्यांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांच्या पिकाला योग्य दर मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-०६-२०१८) :** (१) नाही.
(२) किमान हमीभावापेक्षा अधिक दर देण्याबाबत निवेदने प्राप्त झाली आहेत.
(३) हंगाम २०१६-१७ मध्ये नांदेड जिल्ह्यातील मुखेड,देगलूर व धर्माबाद या तीन तालुक्यात सोयाबीन खरेदीसाठी खरेदी केंद्र उघडण्यात आली होती.त्यापैकी धर्माबाद येथील खरेदी केंद्रावर २ शेतकऱ्यांची ५२.६७ क्विंटल सोयाबीन खरेदी केली आहे.तसेच शासन निर्णय, दिनांक १०.०१.२०१७ अन्वये राज्यातील सोयाबीन पिकाच्या उत्पादना मोठ्या प्रमाणात वाढ होऊन बाजारभाव कमी झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने ऑक्टोबर, २०१६ ते डिसेंबर, २०१६ या कालावधीत कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल २००/- व जास्तीत जास्त २५ क्विंटल प्रति शेतकरी या प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.या अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील १०६०५ लाभार्थी शेतकऱ्याना रुपये ३,८३,९८,५३१/- इतके अनुदान वितरित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगर (जि.ठाणे) मधील आदिवासी विद्यार्थीनीचे शासकीय वसतिगृह रिक्त करण्याचे आदेश दिल्याबाबत

**(१५) ८८२२६ (०९-०८-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) मधील कॅम्प नं.४ परिसरातील भाड्याच्या इमारतीत आदिवासी विद्यार्थीनीचे सरकारी वसतिगृह सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वसतिगृहाचा राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणाहून सुमारे ६० विद्यार्थीनी लाभ घेत असून माहे एप्रिल, २०१७ मध्ये ही इमारत रिक्त करण्याचे आदेश आदिवासी विकास विभागाच्या आयुक्तांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारत रिक्त करण्याची कारणे काय आहेत, तसेच विद्यार्थीनींना राहण्यासाठी शासनाकडून नवीन वसतिगृहाची व्यवस्था करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा (१९-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मुलींच्या वसतीगृहाकरीता सध्या भाड्याने घेतलेल्या इमारतीचे भाडे जास्त असल्याने सदर इमारतीचे भाडेसंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाडून अभिप्राय सादर करण्याबाबत आयुक्त आदिवासी विकास यांनी अपर आयुक्त, ठाणे यांना सूचना दिली होती.

तथापि, सदर इमारतीकरीता निश्चित केलेले भाडे वाजवी असल्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, ठाणे यांनी कळविले आहे. त्याप्रमाणे सध्या भाड्याने घेतलेल्या इमारतीतच सदर वसतीगृह सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडिलांच्या अथवा रक्ताच्या नात्यातील व्यक्तीला मिळालेल्या जातवैधता प्रमाणपत्राच्या आधारे मुलाला अथवा मुलीला जातवैधता प्रमाणपत्र मिळणेबाबत**

**(१६) ९५२८८ (२९-१२-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडिलांच्या अथवा रक्ताच्या नात्यातील व्यक्तीला मिळालेल्या जातवैधता प्रमाणपत्राच्या आधारे मुलाला अथवा मुलीला जातवैधता प्रमाणपत्र देण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०६-२०१८) :** (१) होय.
(२) अर्जदाराच्या रक्तसंबंधातील वडिलांचे किंवा सख्ख्या चुलत्याचे किंवा वडिलांकडील रक्तसंबंधातील इतर कोणत्याही नातेवाईकांचे पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र महत्वाचा पुरावा मानून, इतर पुराव्यांची मागणी न करता सक्षम प्राधिकाऱ्याने जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत शासन अधिसूचना दि.२४/११/२०१७ प्रसिद्ध करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सार्वजनिक प्रयोजनासाठी एम.आय.डी.सी.कडून भूखंड हस्तांतरित करून मिळणेबाबत**

**(१७) ९५६४५ (२९-१२-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विभागातील दिघा, ऐरोली, रबाळे, महापे, पावणे, तुर्भे व नेरूळ या भागातील नागरिकांना स्वच्छतागृह, समाजमंदिर, स्मशानभूमी, अंगणवाड्या इत्यादी स्वरूपाच्या नागरी सुविधा पुरविण्यासाठी भूखंड हस्तांतरीत करून मिळावेत म्हणून नवी मुंबई महापालिकेने औद्योगिक विकास महामंडळाकडे भूखंडाची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त विभागातील नागरिकांना नागरी व मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी व त्यापासून महापालिकेला कोणताही महसूल मिळणारा नसल्याने सदरचे भूखंड नाममात्र दरात महापालिकेला मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उद्योग मंत्री यांना माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) काही भूखंड सार्वजनिक आरोग्य केंद्र, उद्यान, बागबगीचे, स्मशानभूमि, शौचालये इ. सार्वजनिक भूखंड नाममात्र दराने देण्याबाबत महामंडळाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागोठणे (जि.रायगड) येथील शेतातून रिलायन्स कारखान्याने शेतातून गॅस पाईपलाईन टाकल्याबाबत**

**(१८) ९६२१३ (०४-०१-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागोठणे (जि.रायगड) येथील झोतीरपाडा, तरशेत, मुंढाणी, जांभूळटेप आदि गावातील शेतातून रिलायन्स कारखान्याने गॅस पाईपलाईन टाकली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गॅस पाईपलाईन न टाकण्याबाबतच्या मागण्यांचे निवेदन संबंधित अधिकाऱ्यांकडे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त मागण्यांसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०६-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे
(२) हे खरे आहे.
(३) व (४) दहेज ते नागोठणे इथेन पाईपलाईन प्रकल्प रिलायन्स गॅस पाईपलाईन लि. कंपनी राबवित आहे. सदर प्रकल्पाची पाईपलाईन गुजरात राज्यातील दहेज ते महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्हयातील नागोठणे पर्यंत गेली आहे. सदरची पाईपलाईन पेण तालुक्यातील मौजे झोतीरपाडा, खारमुढाणी व जाभुळटेप येथून गेलेली आहे. मौजे तरशेत येथून सदर प्रकल्पाची पाईपलाईन गेलेली नाही. मौजे खारमुंढणी येथील स.न. २१३, १८२, व ८ या जमीनीच्या वापराच्या हक्काच्या संपादना- बाबत श्री. सुरेश महादेव कोकाटे व इतर यांनी दि.२७/०७/२०१७, दि. २६/०९/२०१७ व दि.१५/१२/२०१७ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने उप जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे अहवाल जिल्हाधिकारी रायगड यांना पाठविलेला आहे.

i) पाईपलाईन प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना किंवा त्यांच्या वारसांना संपादन संस्थेस नोकरी देण्याची पेट्रोलियम आणि मिनरल्स पाईपलाईन (जमिनीच्या वापराच्या हक्काच्या संपादनाचा) अधिनियम १९६२ मध्ये तरतूद नाही. तसेच या संपादन संस्थेचे तसे धोरणही नाही.

ii) प्रकल्पात वापराच्या हक्काचे संपादन झालेल्या जमिनीची नुकसान भरपाई पेट्रोलियम आणि मिनरल्स पाईपलाईन (जमिनीच्या वापराच्या हक्काच्या संपादनाचा) अधिनियम १९६२ चे कलम १० नुसार देय आहे. तसेच सदरचे संपादन जमिनींच्या वापराच्या हक्काचे संपादन आहे. प्रकल्पाची पाईपलाईन टाकून झाल्यावर जमीन पूर्ववत करुन शेतक-यांना परत करण्यात येते. सदर संपादनामुळे जमिनीचे हस्तांतरण होत नाही. त्यामध्ये ७/१२ वेगळा करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

iii) पेट्रोलियम आणि मिनरल्स पाईपलाईन (जमिनीच्या वापराच्या हक्काच्या संपादनाचा) अधिनियम १९६२ चे कलम १० नुसार जमिनीची नुकसान भरपाई देय आहे. सदरची नुकसान भरपाई शेतक-यांना मान्य नसल्यास ते न्याय नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क आणि पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखणे अधिनियम २०१३ चे कलम २६(ग) नुसार प्रकल्प संस्थेशी वाटाघाटी करणेची तरतूद आहे.

iv) संपादन संस्थेने Public Liability Insurance Policy under Public Liability Insurance Act १९९१ अंतर्गत रक्कम रुपये ५०,००,००,०००/- प्रकल्पग्रस्तांचा विमा काढलेला आहे.

v) प्रकल्पसंस्थेने मौजे झोतीरपाडा येथील पाईपलाईन सिमांकनात तांत्रिक कारणास्तव अंशत: बदल करुन पाईपलाईन सिमांकनाचा पुन्हामार्गस्त (Reroute) केला आहे. त्यामुळे कलम ६(१) अधिसूचित झालेल्या जमिनीपैकी पाईपलाईन सिमांकनाच्या पुन्हामार्गस्त (Reroute) वगळलेल्या जमिनीबाबत संबंधित जमीन मालकांना याबाबत त्यांना प्रकल्पातुन जमीन वगळण्याचा दाखला देण्यात येईल असे उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, दहेज-नागोठणे ईथेन पाईपलाईन प्रकल्प, ठाणे यांचे कार्यालयाकडून श्री. सुरेश महादेव कोकाटे व इतर यांना कळविण्यात आले आहे. ग्रामस्थांच्या मागणीप्रमाणे कंपनी कायदा १९५६ नुसार सामाजिक जबाबादारी निधीतून मदत करण्याबाबतचे निदेश संपादन संस्थेला देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने दहेज-नागोठणे इथेन पाईपलाईप प्रकल्प पुर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार सामाजिक जबाबदारी निधीतून प्रकल्पस्तांना मदत करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे, असे रिलायन्स गॅस पाईपलाईन कं. यांनी दिनांक १७/०३/२०१८ च्या पत्रान्वये उप जिल्हाधिकारी तथम सक्षम प्राधिकारी दहेज नागोठणे इथेन पाईपलाईन प्रकल्प, ठाणे यांना कळविले आहे.

---

**खानापूर, आटपाडी व रांजणी (ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली) येथे**
**सौर उर्जा प्रकल्प उभारण्याबाबत**

**(१९) ९७१११ (०४-०१-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर, आटपाडी व रांजणी (ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली) येथे सौर उर्जा प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता एकूण किती जमीन संपादित करण्यात येणार आहे,

(३) तसेच सदर प्रकल्पाकरिता किती खर्चाची तरतूद करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदरहू प्रकल्पाचे काम केंव्हापर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

खानापूर येथे टेंभू सिंचन योजनेवर ६० मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्या विषयीची कार्यवाही महानिर्मिती कंपनीकडून सुरू आहे.

आटपाडी व रांजणी (ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली) येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे कार्यवाही सुरू आहे.

(२) ता.खानापूर येथे टेंभू उपसा जलसिंचन योजनेंतर्गत मौजे भेंडवाडी, हिंगणगोंदे, नागेवाडी, माहुली, साळशिंगे, भिकवडी (बु) मधील एकूण १२३ हेक्टर संपादित करण्याची प्रक्रिया महानिर्मिती कंपनीकडून सुरू आहे.

ता.आटपाडी मधील उपलब्ध २४.७४ हेक्टर जमिनीपैकी १६ हेक्टर जमीनीमध्ये मध्ये ८ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी जमीन संपादन करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

मौजे रांजणी ता.कवठेमहांकाळ जि.सांगली येथे अनुक्रमे २४.१२ मेगावॅट व ८४.०५ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी अनुक्रमे ३७.६२ हेक्टर व १३१.११ हेक्टर जमीन उपलब्ध असून प्राथमिक तपासणी अहवाल सादर करण्यात आला आहे. त्यावरील निर्णयांअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) ता.खानापूर येथे टेंभू उपसा जल सिंचन योजना मधील मुलभूत, पायाभूत सुविधा व वीज निष्कासन करण्याचा खर्च जलसंपदा विभागामार्फत करण्यात येणार आहे. तसेच प्रकल्प उभारण्यासाठीचा खर्च विकासका व्दारे करण्यात येणार आहे.

ता.आटपाडी व रांजणी, ता.कवठेमहांकाळ हे सार्वजनिक खाजगी भागीदारीने (PPP) तत्वावरील असल्याने "मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना" अंतर्गत मुलभूत, पायाभूत सुविधा, वीज निष्कासन व प्रकल्प उभारण्यासाठीचा खर्च हा विकासकाव्दारे करण्यात येणार आहे.

(४) खानापूर, आटपाडी व रांजणी ता,कवठेमहांकाळ, जि.सांगली येथे सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम प्राथमिक स्तरावर सुरू असून ते पूर्ण झाल्यानंतर सदर प्रकल्प कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

---

**जातीचा दाखला मिळणेसाठी असलेल्या जाचक अटी शिथिल करण्याबाबत**

**(२०) ९९२३७ (०६-०१-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्गीयांना त्यांचे ज्या जिल्ह्यात किमान ५ वर्षापेक्षा जास्त काळ वास्तव्य आहे, त्यांना त्या जिल्ह्यातच जातीचा दाखला दिला जाणार आहे असे दिनांक ६ ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जातीचा दाखला मिळण्यासाठी अनुसूचित जातीच्या लोकांना १९५० चा आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती यांना १९६१ चा जातीबाबतचा पुरावा द्यावा लागतो, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधितांना इतक्या पुर्वीचा पुरावा मिळणे अशक्य असल्याने बऱ्याच विद्यार्थ्यांना त्यांच्या आई-वडिल यांचे दाखले सादर करावे अशी अट देखील घालण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधितांना जातीचा दाखला मिळण्यासाठीच्या अटी काढून टाकण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-०७-२०१८)** : (१) नाही.
महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ मधील नियम क्र.३ व नियम क्र.५ नुसार शर्ती निश्चित केलेल्या आहेत.
(२) होय.
उक्त नमूद नियमानुसार अनुसूचित जातीसाठी दि.१० ऑगस्ट, १९५० व विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी दि.२१ नोव्हेंबर, १९६१ हे मानीव दिनांक महाराष्ट्रातील मूळ वास्तव्याची खात्री करण्यासाठी विहित केले आहेत.
(३) नाही.
उक्त नमूद नियमातील नियम ४ अन्वये वडिलांकडील रक्तनाते संबंधीतील व्यक्तींचे जातीचे पुरावे सादर करण्याबाबत नमूद आहे.
(४) उक्त नमूद नियम, २०१२ मध्ये शासन अधिसूचना दि.२४/११/२०१७ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित अर्जदाराने त्याच्या रक्तसंबंधातील वडिलांचे किंवा सख्ख्या चुलत्याचे किंवा वडिलांकडील रक्तसंबंधातील इतर कोणत्याही नातेवाईकांच्या जात वैधता प्रमाणपत्रासह अर्ज केल्यास, अर्जदारास इतर पुराव्यांची मागणी न करता संबंधित अर्जदाराने सादर केलेले वडिलांकडील रक्तसंबंधातील नातेवाईकांचे जात वैधता प्रमाणपत्र महत्वाचा पुरावा मानून जात प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल अशी सुधारणा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखलदरा व धारणी (जि.अमरावती) तालुक्यात सौर दिवे बसविण्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२१) ९९८६३ (०६-०१-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा व धारणी (जि.अमरावती) तालुक्यात ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत एकात्मिक आदिवासी योजनेत सन २०१२ ते २०१४ या वर्षाकरीता राबविण्यात आलेल्या सौर दिवे बसविणे या कामात सेव्हन ग्रीन सोलर सिस्टीम प्रा.लि. या कंपनीकडून अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दोन्ही तालुक्यांत सर्व्हेक्षण केलेल्या ठिकाणी सौर उर्जा दिवे न बसविता कंत्राटदाराकडून मनमानीपणे दुसऱ्याच ठिकाणी दिवे बसविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मनमानीपणे व गैरकारभार करुन सौर उर्जा दिवे बसविणाऱ्या कंत्राटदारांविरुध्द व त्यास मदत करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (३०-०६-२०१८) :** (१) व (२) खरे नाही.
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी यांनी ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजेंतर्गत सौर दिवे आस्थापित करण्यासाठी सेवन ग्रीन, सोलार सिस्टीम प्रा.लि. यांना सन २०१२-१३ या वर्षासाठी ६ कामे तर सन २०१३-१४ या वर्षात एकूण ३० कामे करण्याचे आदेश दिले होते. सदर कंपनी कडून आदेशित ठिकाणीच सौर दिवे आस्थापित करण्यात आले आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील सूर्या नदीवरील पुलाच्या बांधकामास विलंब झाल्याबाबत**

**(२२) १००१३५ (०६-०१-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील चिल्हार-बोईसर मुख्य रस्त्यावरील सूर्या नदीवरील पुलाच्या बांधकामास विलंब होत असल्याबाबत माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार सूर्या नदीवरील पुलाचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०६-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर पुलाचे काम जुन २०१७ पर्यंत चालू होते. तद्नंतर पावसाळयाच्या कालावधीत माहे ऑक्टोबर, २०१७ पर्यंत पुलाचे काम पुर्णत: बंद होते.

(३) व (४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत चिल्हार बोईसर रस्त्यावरील हातनदी व सुर्या नदीवरील सध्याच्या पुलाच्या शेजारी नवीन चौपदरी पुलाचे बांधकाम दि.१६/०६/२०१४ पासून हाती घेण्यात आले असून पुर्णत्वाचा कालावधी पावसाळयासह ३६ महिने म्हणजे दिनांक १५/०६/२०१७ पर्यंत होता. त्यानुसार हात नदीवरील चौपदरी पुलाचे काम माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये पुर्ण करुन वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला आहे. सुर्या नदीवरील पुलाच्या पोहोच रस्त्याच्या भूसंपादनामधील अडचणी व पावसाळयामुळे विलंब झाला असून ते दि. १४ जुन, २०१८ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**कागल तालुक्यात (जि.कोल्हापूर) ऑक्टेगा ग्रीन पॉवर ॲन्ड शुगर कंपनीने बेकायदेशीररित्या मद्यनिर्मिती केली असल्याबाबत**

**(२३) १०२०७१ (०१-०१-२०१८). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कागल तालुक्यात (जि.कोल्हापूर) ऑक्टेगा ग्रीन पॉवर ॲन्ड शुगर कंपनीने सन २००९ ते २०१० या कालावधीमध्ये बेकायदेशीररित्या मद्यनिर्मिती केली असून याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर कंपनी विरोधात राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर विभागाचे अधिक्षक व उपअधिक्षक यांचेकडे लेखी तक्रार देवून देखील अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यातक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बेकायदेशीररित्या मद्यनिर्मिती करणाऱ्या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

अनुज्ञप्तीच्या व्यवहाराबद्दल त्याच कंपनीतील तत्कालीन कर्मचा-यांनी तक्रार केली होती.

(२) व (३) हे खरे नाही.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार यांच्या मागणीनुसार जिल्हाधिकारी,कोल्हापूर यांच्याकडे सुनावणी देण्यात आली.

तसेच सदरहू घटकाचे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकारी यांनी केलेल्या तपासणीवेळी आढळून आलेल्या विसंगतीबाबत घटकास कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. सदर नियमभंगाबाबत घटकाने सादर केलेल्या खुलाशानुसार शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वीज कंपनीतील देखभाल व दुरुस्तीची कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यासह सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना देणेबाबत**

**(२४) १०२९९१ (०१-०१-२०१८). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीज कंपनीतील देखभाल व दुरुस्तीची कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यासह सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना देणेबाबत माहे एप्रिल, २०१५ च्या सुमारास शासनाकडे मागणी करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यासाठी होल्डिंग कंपनी समोर सादरीकरण करण्याबाबत मा.मंत्री महोदयांनी निर्देश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे

(२) होय, हे खरे आहे

(३) व (४) ऊर्जा विभागाच्या दि. २६ मार्च, २०१५ च्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यान्वित असलेली स्थापत्य व विद्युत सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना सरळ नोंदणी करुन लॉटरी पध्दतीने थेट कामे वाटप करण्याबाबतच्या प्रचलित सार्वजनिक बांधकाम विभागातील योजनेसारखीच योजना ऊर्जा विभागांतर्गत महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या कंपन्यांमध्ये लागू करण्यास आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

---

**राज्यातील ६० हजाराहून अधिक बंद पडलेल्या बोगस कंपन्यांवर कारवाई करण्यासंदर्भात केंद्र शासनाने राज्य शासनास निर्देश दिल्याबाबत**

**(२५) १०५४०८ (१९-०४-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने, राज्यात सुमारे ६० हजाराहून अधिक बंद पडलेल्या बोगस कंपन्यांचा शोध घेऊन तसेच या कंपन्यांच्या मालमत्तेची विक्री/हस्तांतरण व इतर आर्थिक व्यवहार न करण्याबाबतच्या दिलेल्या सूचनेनुसार अद्याप सदर प्रकरणी शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपन्यांचा शोध घेऊन कारवाई करण्याबाबत शासनाकडून होत असलेला विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कार्यवाही केली असल्यास, मुंबईसह राज्यात एकूण किती बोगस कंपन्या आढळून आल्या आहेत, सदरहू बोगस कंपन्या विरुध्द अद्यापपर्यंत शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२६-०६-२०१८)** : (१), (२), (३) व (४) केंद्र शासनाच्या कॉर्पोरेट कार्यालय, नवी दिल्ली यांनी दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ व १३ ऑक्टोबर, २०१७ च्या पत्रान्वये रजिस्ट्रार ऑफ कंपनीज कार्यालयाकडून केंद्र शासनास प्राप्त झालेली कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २४८(५) अन्वये बंद (struck off) कंपन्यांची यादी राज्य शासनास पाठविली आहे. त्यापैकी महाराष्ट्र राज्यात एकूण ६०१०५ मान्यता रद्द केलेल्या शेल कंपन्या आहेत. त्यापैकी मुंबई जिल्हयामध्ये ५०,०२२ व पुणे जिल्हयामध्ये १०,०८३ शेल कंपन्या आहेत.

या बंद कंपन्यांची महाराष्ट्र राज्यातील अचल मालमत्ता संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी शोधून ताब्यात घ्यावयात व कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २५२ अन्वये या बंद कंपन्या पूर्नस्थापित करण्याचे आदेश केंद्र शासनाकडून प्राप्त होईपर्यंत, या मालमत्तांची विक्री, हस्तांतरण, इ. करण्यात येऊ नये अशा सूचना केंद्र शासनाकडून देण्यात आल्या आहेत.

उद्योग विभागाच्या दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ व दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ च्या पत्रान्वये प्रधान सचिव (महसूल व वन विभाग) तसेच नोंदणी महानिरिक्षक,महाराष्ट्र राज्य, सर्व विभागीय आयुक्त यांना केंद्र सरकारच्या सूचनांचे तात्काळ पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या आधारे राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (N.I.C.), पुणे यांनी पडताळणी अहवाल तयार केला आहे. या पडताळणी अहवालास अनुसरुन, नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाने दिनांक ३१ जानेवारी, २०१८ व १४ फेब्रूवारी, २०१८ च्या पत्रान्वये कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, नवी दिल्ली यांना माहिती सादर केली आहे. तसेच सदर माहिती संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केली आहे.

त्यानुसार नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक १९ जून, २०१८ च्या पत्रान्वये राज्यातील शेल कंपन्यांनी विकत घेतलेल्या मिळकतीच्या नोंदणीस प्रतिबंधित करण्याबाबतची सुविधा संगणक प्रणालीमध्ये करण्याबाबतचे निर्देश अधिनस्त दुय्यम निबंधकांना देण्याबाबत सर्व नोंदणी उपमहानिरिक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांना कळविले आहे.

---

**राज्यातील शासकीय तसेच सार्वजनिक वापरातून 'दलित' हा शब्द वगळण्याबाबत**

**(२६) १०५९२० (२०-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय तसेच सार्वजनिक वापरातून 'दलित' हा शब्द वगळण्यात यावा अशी मागणी अनेक संघटनांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जातींसाठी "दलित" हा शब्द जातीवाचक ठरवून तो भाषेच्या वापरातून वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-०७-२०१८) :** (१) होय.

(२) केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या दि.१५/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये “दलित” शब्दा ऐवजी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४१ नुसार निर्गमित केलेल्या मा.राष्ट्रपतींच्या आदेशांतर्गत नमूद अनुसूचित जातीच्या संबोधनाकरिता सर्व सरकारी व्यवहार, प्रकरणे, प्रमाणपत्र इत्यादीमध्ये “दलित” या शब्दाऐवजी इंग्रजी भाषेत “Scheduled caste” आणि मराठी भाषेत “अनुसूचित जाती” या संबोधनाचा वापर करण्याबाबतची बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील बदलापूर पाईपलाईन रोडवरील जलवाहिनीतून**
**पाण्याची चोरी होत असल्याबाबत**

**(२७) १०६२८५ (०४-०४-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील बदलापूर पाईपलाईन रोडवरील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मोठ्या जलवाहिनीतून कल्याण-शिळफाटा रोडला असलेल्या एमआयडीसीच्या मोठ्या पाईपलाईन्सला भोक पाडून खुलेआम पाण्याची चोरी करण्यात येत असल्याबाबत स्थानिक नागरिकांनी एमआयडीसी आणि केडीएमसी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करुन या पाणी चोरीचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

डोंबिवली विभाग आपले सरकार या पोर्टलवर मेन पाईपलाईन मधून पाणी चोरीबाबत श्री.एस.व्ही. कदम यांनी तसेच डोंबिवली वेलफेअर असोसिएशन चे सचिव श्री. नलावडे यांनी दि.१ जानेवारी २०१८ रोजी च्या पत्रान्वये कल्याण शिळा रोड वरील पाईपलाईनच्या Expansion joints मधून गळती होत असल्याची तक्रार म.औ.वि.महामंडळाकडे केली होती.

(२) बारवी पाणीपुरवठा योजनेच्या काटई ते बदलापूर रस्त्यावरील पाईपलाईनवर माहे मार्च-२०१७ ते मार्च-२०१८ या कालावधीत एकुण १०९३ अनधिकृत नळजोडण्या निष्कासित करण्यात आल्या. अनधिकृत नळजोडण्या आढळून आल्यास त्या ताबडतोब बंद करण्याचे काम प्राधान्याने करण्यात येऊन पाणी गळती बंद करण्यात येते.

मा. उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दि.०३/०४/२०१८ रोजी बैठक झाली. बैठकीत अनधिकृत नळजोडण्या करणाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार दिनांक ०९/०४/२०१८ ते दिनांक १७/०४/२०१८ या कालावधीत एकुण ४४ अनधिकृत नळजोडण्या करणाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याची कारवाई प्राधान्याने हाती घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांच्या निवृत्तीवेतनात वाढ करण्याबाबत

**(२८) १०७१६७ (१७-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात संजय गांधी निराधार योजना तसेच श्रावणबाळ योजना या योजनेतील लाभार्थ्यांच्या निवृत्तीवेतनात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी लाभार्थ्यांच्या निवृत्तीवेतनात वाढ करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले (१३-०६-२०१८) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी लाभार्थ्यांच्या निवृत्तीवेतनात वाढ करण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.

---

### पारनेर तालुक्यातील (जि.अहमदनगर) साई कृपा कारखान्याने उस उत्पादक शेतकऱ्याची थकित देयके देण्याबाबत

**(२९) १०७२३५ (१७-०४-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारनेर तालुक्यातील (जि.अहमदनगर) साई कृपा कारखान्याकडून उस उत्पादक शेतकऱ्यांची देयके देण्याबाबत मा.मुख्यमंत्री, सहकार मंत्री, कारखान्याचे मालक व दूध संचालक मंडळ आदिंकडे बजरंग मंडळाच्या अध्यक्षांनी माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदरहू पैसे परत न केल्यास बजरंग मंडळाच्या अध्यक्षांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने साई कृपा कारखान्याकडून शेतकऱ्यांचे पैसे मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०९-०७-२०१८) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) होय.

श्रीगोंदा तालुक्यात साईकृपा शुगर, युनिट-१ देवदैठण व साईकृपा शुगर, युनिट-२ हिरडगांव हे दोन कारखाने स्थापीत आहेत. यापैकी युनिट-१ या कारखान्याने हंगाम २०१७-१८ मध्ये ऊस गाळप केलेले आहे तर युनिट-२ ने हंगाम घेतला नाही.

युनिट-१ देवदैठण या कारखान्याने हंगाम २०१७-१८ मध्ये गाळप केलेल्या ऊसाचे देय FRP प्रमाणे रु. ४३७ (१)०५ लाख रक्कमेची देयके ऊस पुरवठादारांना अदा केली आहेत.

युनिट-२ कडे हंगाम २०१४-१५ मधील ऊस पुरवठादारांचे रु. ३८२५.१० लाख ऊस पेमेंट थकीत राहील्याने कारखान्याविरुध्द दि. १२/८/२०१५ रोजी RRC कारवाई करुन जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना प्राधिकृत केले आहे.

कारखान्यावर पंजाब नॅशनल बँकेचे कर्ज असून कारखान्यावर प्रथम बँकेचा ताबा असल्याने जिल्हाधिकारी यांना ताबा घेता येत नाही. सद्यस्थितीत कारखान्याने रु. ३८२५.१० लाख थकीत FRP पैकी रु. १९१३.५४ लाख रक्कम ऊस पुरवठादारांना अदा केली असून रु. १९१ (१)५६ लाख रक्कम अदा करणे बाकी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयात १५ ते २० हजार जात पडताळणीची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(३०) १०७८८४ (२३-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात गेल्या वर्षभरापासून १५ ते २० हजार जात पडताळणीची प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे हे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने जात पडताळणीची प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-०७-२०१८)** (१) समितीकडे माहे नोव्हेंबर, २०१७ अखेर ११५६३ इतकी प्रकरणे प्रलंबित होती. सदर प्रलंबित प्रकरणांपैकी फेब्रुवारी, २०१८ अखेर १०६८१ प्रकरणे समितीने निकाली काढलेली आहेत.

(२) नाही.

सदर प्रकरणांपैकी १०१९० प्रकरणे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये इयत्ता १२ वी विज्ञान शाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची होती व सदर विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता जून, २०१८ नंतर लागणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत नाही अथवा झालेले नाही.

(३) अर्जदाराकडून आवश्यक सर्व कागदपत्राची पूर्तता झाल्यास विहित मर्यादेत सदरची प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही होते. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चोंढे (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील घाटघर उदंचन जलविद्यूत प्रकल्पातील १२ प्रकल्पग्रस्तांना अद्याप महानिर्मितीच्या सेवेत सामावून घेण्यात आले नसल्याबाबत**

**(३१) १०८९५० (०४-०४-२०१८). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील चोंढे येथील घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्पातील १२ प्रकल्पग्रस्तांना महानिर्मिती कंपनीकडून बीटीआरआय सेंटर, एकलहरे, नाशिक येथे कंपनीच्या खर्चाने देण्यात आलेले ३ वर्षाचे प्रशिक्षण संपल्यानंतरसुध्दा या प्रकल्पग्रस्तांना अद्याप महानिर्मितीच्या सेवेत सामावून घेण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांना सेवेत सामावून घेण्याची मागणी मा.मुख्य महाव्यवस्थापक (मास), प्रकाशगड, मुंबई यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रकल्पग्रस्त सातत्याने करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पग्रस्तांना अद्याप नोकरीत सामावून न घेण्याची कारणे काय आहेत, याबाबत तातडीने सेवेत घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०६-२०१८) :** (१) महानिर्मिती कंपनीच्या धोरणानुसार महानिर्मिती कंपनीने स्वत:च्या मालकीच्या विद्युत केंद्रासाठी जमिन संपादित केली असेल आणि ती मालमत्ता महार्निमिती कंपनीच्या नांवे असेल तरच संबंधित जमिनधारक महानिर्मिती कंपनीचा प्रकल्पग्रस्त म्हणून गणला जातो. घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्पाकरिता जलसंपदा विभागाने जमिन संपादित केली असल्यामुळे, संबंधित प्रकल्पग्रस्त हे महानिर्मिती कंपनीचे प्रकल्पग्रस्त नाहीत. तथापि, महानिर्मिती कंपनीद्वारा संबंधित प्रकल्पग्रस्तांना सामाजिक उत्तरदायित्व योजनेंतर्गत बीटीआरआय चे प्रशिक्षण देण्यात आले आहे. महानिर्मिती कंपनीच्या तंत्रज्ञ-३ पदाच्या सरळसेवा जाहिरात क्र.०४(ऑगस्ट)/२०१४ व ०२(फेब्रुवारी)/२०१६ मध्ये ज्या उमेदवारांनी महानिर्मिती कंपनीकडून बीटीआरआय अंतर्गत ०३ वर्षाचे प्रशिक्षण घेतले त्या उमेदवारांच्या बीटीआरआय व्यवसायांचा समावेश जाहिरातीत करण्यात येऊन त्यांना तंत्रज्ञ-३ या पदाकरिता अर्ज करण्याची मुभा देण्यात आलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात गेल्या दीड शतकात सुमारे ४५ हजार लघु व मध्यम उद्योग बंद पडल्याबाबत**

**(३२) १०९१३० (१९-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), अॅड.यशोमती**

**ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या दीड शतकात सुमारे ४५ हजार लघु व मध्यम उद्योग बंद पडले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी राज्यात गुंतवणूक, उद्योग व रोजगार वाढीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (०४-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही. चौथ्या औद्योगिक प्रगणनेच्या अहवालानुसार माहे मार्च, २००७ अखेर राज्यात बंद असलेल्या उद्योगांची संख्या ३४३२७ इतकी आहे. त्यानंतर औद्योगिक प्रगणना झालेली नाही.

(२) बंद उद्योगांना उर्जितावस्थेत आणण्यासाठी शासनाकडून वेळोवेळी उपाययोजना करण्यांत येतात. महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३ नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद असलेल्या उपक्रमांना सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध होऊन, बंद उद्योग पुन्हा सुरु होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय दिनांक २ मे, २०१३ अन्वये विशेष अभय योजना जाहीर केली होती. सदर योजनेंतर्गत जे उद्योग घटक विहित कार्यपध्दतीत योग्य ते निकष पूर्ण करतील अशा उद्योग घटकांना विशेष अभय योजनेद्वारे सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर योजनेमध्ये पात्र ठरणाऱ्या घटकाने राज्य शासनाची सर्व मुद्दलाची रक्कम एक रकमी भरल्यास व्याज व दंडव्याज माफ करण्याची तरतूद आहे. सदर योजनेस शासन निर्णय दिनांक ६ मे, २०१६ अन्वये दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यांत आली होती.

रोजगार निर्मितीस चालना देण्यासाठी व उद्योगांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी राज्यात सामुहिक प्रोत्साहन योजना सन १९६४ पासून सुरु करण्यात आली. या योजनेत वेळोवेळी बदल व सुधारणा करण्यात आल्या आहेत. सामुहिक प्रोत्साहन योजनेचा समावेश राज्याचे औद्योगिक धोरण २०१३ मध्ये करण्यात आला आहे. हे धोरण सप्टेंबर, २०१८ पर्यंत किंवा नवीन धोरण जाहिर होईपर्यंत वैध राहील.

प्रचलित सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत जिल्हयातील तालुक्यांची त्यांच्या औद्योगिक विकासाच्या प्रतवारीप्रमाणे अ,ब,क,ड,ड+ आणि विना उद्योग जिल्हा व नक्षलग्रस्त क्षेत्र अशा सात गटात विभागणी करण्यात आली आहे. राज्यातील सुक्ष्म, लघु, मध्यम व मोठया उद्योगांना योजनेतील तालुका वर्गवारीनुसार विहित मर्यादेपर्यंत औद्योगिक प्रोत्साहन अनुदान, व्याज अनुदान, विद्युत शुल्क माफी, मुद्रांक शुल्क माफी, विद्युत कर अनुदान, सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे सक्षमीकरण, गुणात्मक स्पर्धा, संशोधन व विकास कार्य आणि तांत्रिक क्षेणीमध्ये वाढ, इ. प्रोत्साहनांचा लाभ देय आहे. तसेच विशाल व अतिविशाल घटकांना शासनाने देकार पत्रामध्ये देवू केलेली प्रोत्साहने देण्यात येतात.

प्रचलित सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत अविकसित भागात जास्तीत जास्त गुंतवणूक होऊन उद्योगांना या योजनेतील प्रोत्साहनांचा जास्तीत जास्त लाभ मिळावा व या योजनेकडे जास्तीत जास्त उद्योग आकर्षित होऊन रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने राज्यातील एकूण ३५५ तालुक्यांपैकी २७९ तालुक्यांना ड+ दर्जा देण्यात आला आहे.

राज्यात गुंतवणूक वाढीच्या खालील नवीन योजना जाहिर केल्या आहेत.

१) माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०१५

२) राज्याचे किरकोळ व्यापार धोरण

३) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष सामुहिक प्रोत्साहन योजना दिनांक ११ फेब्रूवारी, २०१६

४) महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण २०१६, दिनांक ११ एप्रिल, २०१६

५) राज्यातील महिला उद्योजकांसाठी विशेष धोरण -दिनांक १४ डिसेंबर, २०१७

६) अवकाश व सरंक्षण क्षेत्र उत्पादन धोरण-२०१८, दिनांक १४ फेब्रूवारी, २०१८

७) महाराष्ट्र इलेक्ट्रीक व्हेईकल प्रोत्साहन धोरण-२०१८, दिनांक १४ फेब्रूवारी, २०१८

८) महाराष्ट्र काथ्या धोरण-२०१८, दिनांक १५ फेब्रूवारी, २०१८

तसेच गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी मेक इन इंडिया ही परिषद तसेच मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हर्जन्स आयोजित केला होता.

उद्योग विभागाच्या शासन निर्णय दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये सुधारित खरेदी धोरण लागू करण्यात आले आहे. सदर धोरणानुसार मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेची दरकरार पध्दती संपूष्टात आणली असून, रु.३.०० लक्ष वरील खरेदीकरिता ई-निविदा कार्यपध्दती बंधनकारक करण्यात आली आहे. सदर खरेदी धोरणामध्ये अभिव्यक्ती स्वारस्य पध्दतीने खरेदी, स्वीस चॅलेंज खरेदी पध्दती, इ. नाविन्यपूर्ण खरेदी पध्दतीचा समावेश करण्यात आला आहे. मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत अंध, अपंग यांच्या संस्था व हातमाग महामंडळ / महासंघ (महाटेक्स) यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची दरनिश्चिती, दोन किंवा अधिक प्रशासकीय विभागांना लागणाऱ्या वस्तूंची खरेदी व शासकीय खरेदीच्या संदर्भात धोरण आखणी करण्याची जबाबदारी ठेवण्यात आली आहे.

सुधारित खरेदी धोरणामध्ये सुक्ष्म व लघु उद्योगांमार्फत खरेदी करण्यासाठी २४१ वस्तू राखीव ठेवण्यात आल्या आहेत. राखीव वस्तूंची १०० टक्के खरेदी सुक्ष्म व लघु उद्योगामार्फत करताना, त्यापैकी २० टक्के खरेदी अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीच्या उद्योजकांसाठी राखीव ठेवण्यात आली आहे. खरेदीसाठी राखीव नसलेल्या वस्तूबाबत २० टक्के खरेदी सुक्ष्म व लघु उद्योगांसाठी न्युनतम (एल-१) दराने राखीव ठेवण्यात आली असून, या २० टक्के पैकी ४ टक्के खरेदी अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीच्या उद्योजकांसाठी राखीव ठेवण्यात आली आहे.

(३) लागू नाही.

**सांगली जिल्ह्यातील खानापूर, आटपाडी व तासगांव तालुक्यातील रस्त्यांची पवनऊर्जेच्या वाहतुकीमुळे दुरवस्था झाल्याबाबत**

**(३३) १०९३१४ (१८-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील खानापूर, आटपाडी व तासगांव तालुक्यातील बहुतांश रस्त्यांची पवनऊर्जा प्रकल्पासाठी होत असलेल्या वाहनांच्या वाहतुकीमुळे दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबतचा निधीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रलंबित निधी प्रस्तावास तात्काळ मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१८) :** (१), (२) व (३) राज्यामध्ये पवनऊर्जा प्रकल्पांमुळे खराब झालेल्या रस्त्यांसाठी महाऊर्जाकडून शासनास प्राप्त झालेल्या १२९ रस्ते दुरुस्ती प्रस्तावांसाठी शासन निर्णय क्र. बीयुडी २०१७/प्र.क्र २६१/ऊर्जा-७, दि. १९ डिसेंबर, २०१७ अन्वये रु.८९.४० कोटी इतका निधी महाऊर्जास वितरीत करण्यात आला आहे. त्यात सांगली जिल्हयातील खानापूर, आटपाडी व तासगाव तालुक्यातील एकूण ४५ रस्त्यांचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील १४ कारखान्यांनी २२५ कोटी रुपये एफआरपी थकविल्याबाबत**

**(३४) १०९६६९ (२०-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील १४ कारखान्यांनी २२५ कोटी रुपये एफआरपी थकविल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त, घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना त्यांच्या थकबाकीची रक्कम मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्हयातील कारखान्यांकडे एफ. आर. पी. पोटी रु.९५० कोटी रक्कम थकीत असल्याचे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आले.

(२) व (३) होय.

याबाबत साखर आयुक्त कार्यालयात थकीत एफ.आर.पी.बाबत दिनांक ०२.०१.२०१८, दि.०९.०१.२०१८, दि.१३.०३.२०१८,दि. १४.०३.२०१८, दि.१३.०४.२०१८ व दि.२४.०४.२०१८ रोजी सुनावण्या घेण्यात आलेल्या आहेत. भोगावती ससाका, वारणा ससाका व रेणुका-पंचगंगा शुगर्स या कारखान्यांवर दिनांक १६.०४.२०१८ रोजी आर.आर.सी. कारवाई करण्यात आलेली आहे. दिनांक ३०.०४.२०१८ च्या ऊसदर देयबाकी अहवालानुसार कोल्हापूर जिल्हयातील कारखान्यांकडे एफ. आर. पी. पोटी रु. २९८.५१ कोटी रक्कम थकीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना राबविण्याच्या निर्णयाबाबत**

**(३५) १०९९८४ (०४-०४-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना माफक दरात व त्यांच्या सोईनुसार वीजपुरवठा होण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाने कोणत्या अटी व शर्थी घातल्या आहेत काय,

(४) तसेच सदर योजनेची अंमलबजावणी प्रत्यक्षात केव्हांपासून करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०७-२०१८) :** (१), (२) व (३) “मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना” ही योजना राज्यात ऊर्जा विभागाच्या दि. १४ जुन, २०१७ च्या व दि. १७ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत असून त्यात योजनेचे स्वरूप व अंमलबजावणी बाबतची कार्यपध्दती नमूद करण्यात आली आहे.

(४) सदर योजने अंतर्गत प्रत्येकी २ मेगावॅटचे पथदर्शी प्रकल्प राळेगणसिध्दी (जि. अहमदनगर) व मांजरडा- कोळबी (जि. यवतमाळ)येथे आस्थापित करण्यात येत आहेत. पथदर्शी प्रकल्पा व्यतिरिक्त योजनेच्या टप्पा-१ मध्ये विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व उत्तर महाराष्ट्र येथे सदर योजनांतर्गत प्रकल्प आस्थापित करण्यासाठी एकूण २०० मे.वॅ.

क्षमतेच्या निविदा प्रकाशीत करण्यात आल्या असून प्रकल्प उभारण्यासाठी विकासकांना इरादापत्र ( LOI ) देण्यात आले आहे.
योजनेच्या टप्पा-२ मध्ये विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र येथे एकूण ३०० मे.वॅ. क्षमतेच्या प्रकल्पांसाठी निविदा प्रकाशित करण्यात आल्या असून विकासकांना इरादा पत्र (Letter of Intent) देण्यात आले आहे. याशिवाय महावितरण कंपनीने १००० मेगावॅट क्षमतेच्या निविदा प्रकाशित केल्या आहेत.

---

**राज्यातील धनगर समाजाला शैक्षणिक व शासकीय नोक-यांमध्ये आरक्षण देण्याबाबत**

**(३६) १०९९८७ (०४-०४-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :**
सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धनगर समाजाला शैक्षणिक व शासकीय नोक-यांमध्ये आरक्षण देण्याबाबत टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सतर्फे सर्वेक्षण करण्यात येत असून याबाबतचा अहवाल अद्यापही शासनास सादर करण्यात आला नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातारा जिल्हयातील दहीवडी येथे धनगर समाजाने या मागणीबाबत दि.१६ मार्च, २०१७ रोजी भव्य मोर्चा काढला होता, तसेच आरक्षणाबाबत धनगर समाजाकडून सातत्याने आंदोलनाद्वारे मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धनगर समाजाला आरक्षण देण्यासंदर्भातील अहवाल तयार करण्याकरिता उक्त संस्थेला सर्वेक्षण करण्यास लागत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व अहवाल किती कालावधीत शासनास सादर करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त संस्थेचा अहवाल सादर झाला असल्यास अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे व त्यानुसार त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२९-०५-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) टाटा इन्स्टटियुट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या संस्थेकडून करण्यात आलेल्या सर्वेक्षण व संशोधनाच्या अनुषंगाने, महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमधील १०८ तालुक्यामधील ३२४ गावांमध्ये भरलेल्या ५००० प्रश्नावली यांचे विश्लेषण मुख्य अहवालामध्ये समावेश करण्याचे काम सुरु आहे. तसेच अभ्यासक, अधिकारी व विशेष तज्ञ यांनी भेटी दिलेल्या विविध पाच राज्यांचा अभ्यास व त्यातुन मिळालेल्या माहितीचे एकत्रिकरण करुन त्याचे संकलन करण्यात आलेले आहे. विविध समित्या व आयोग यांचे अहवाल, भारतीय जाती-जमांतीचा मानववंशशास्त्रीय, समाजशास्त्रीय व ऐतिहासिकदृष्ट्या अभ्यास, न्यायालयीन न्यायनिवाडे आणि धनगर समाजातील नागरिकांनी सादर केलेले दस्तावेज या सर्वांचे चिकीत्सक परिक्षण करुन त्यांचे संकलन करण्यात आले असून या संकलनाला मुख्य अहवालामध्ये समाविष्ट करण्याचे काम सुरु आहे.

संकलीत माहितीच्या आधारे मुख्य अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून लवकरच मुख्य अहवाल टाटा इन्स्टटियुट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या संस्थेकडून सादर करण्यात येणार आहे.

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून दिनांक २.१ (१)२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झालेला वस्तुस्थितीदर्शक अभिप्रायात्मक अहवाल प्राप्त झालेला आहे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांचेमार्फत प्राप्त होणाऱ्या अंतिम अहवालानंतरच पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील औद्योगिक विकासाकरिताचा निधी वाढविण्याबाबत**

**(३७) ११०५११ (१९-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनामार्फत जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून अनुसूचित जाती आणि नवबौध्द घटकातील तरूण-तरूणींना रोजगार तसेच स्वंय-रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उद्योगजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम, सुशिक्षित बेरोजगारांसाठी बीज भांडवल अर्थसहाय्य तसेच जिल्हा उद्योगधारकांसाठी कर्ज योजना राबविली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंगोली जिल्हयातील अनुसुचित जातीसाठी बीजभांडवलाची ६ लाख उद्दिष्ट असून मार्जिन मनीचे २ लाख, उद्योजकता विकास प्रशिक्षणास ८ लाख तसेच अनुसुचित जमातीसाठी सीडमनीचे ७ लाख, मार्जिन मनी २ लाख आणि उद्योजकता प्रशिक्षणास ८ लाख तर सर्व सामान्यांसाठी बीजभांडवलाचे १६ लाख ८० हजार मार्जिन मनीचे ३ लाख तर उद्योजकता विकास प्रशिक्षणासाठी १६ लाख रूपयांचे उद्दिष्ट आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू उद्दिष्ट असतानाही उक्त निधीच प्राप्त झालेला नाही, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, हिंगोली जिल्हयास या योजनेंतर्गत निधी प्राप्त झाला नसल्याने, तसेच प्राप्त झालेला निधीहा अल्प प्रमाणात असल्याने उक्त अल्प निधीमध्ये उद्योग कसा सुरु करावा असा प्रश्न नव उद्योजक तरूणांमध्ये निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हिंगोली जिल्हयासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-०६-२०१८) :** (१) होय.

उद्योग संचालनालयाच्या अंतर्गत राज्यातील सर्व जिल्हा उद्योग केंद्रे या जिल्हास्तरीय कार्यालयाकडून संबंधित जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सर्वसाधारण, अनुसूचित जाती उप योजना व आदिवासी उपयोजना अंतर्गत सुशिक्षित बेराजगारांना सूक्ष्म सेवा व उद्योग घटक स्थापित करण्यासाठी / स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी, सुधारित बीज भांडवल योजना, जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना व उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम या योजनांची अंमलबजावणी करण्यात येते.
(२) जिल्हा उद्योग केंद्र हिंगोली कार्यालयासाठी सन २०१७-१८ साठी जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने जिल्हा वार्षिक योजना-अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत खालीलप्रमाणे उद्दिष्टे / निधी प्राप्त झालेला आहे.

| **सुधारीत बीज भां. योजना** | | | | |
|---|---|---|---|---|
| | **आर्थिक** | | **भौतिक** | |
| | **उद्दिष्ट** | **खर्च** | **उद्दिष्ट** | **साध्य** |
| सर्वसाधारण | १६.०० | १२.८० | ४० | २१ |
| एससीपी | ६.०० | ०.८५ | १० | ०३ |
| ओटिएसपी | ४०.०० | ०.२० | १८ | ०१ |
| **जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना** | | | | |
| सर्वसाधारण | ३.०० | ०.६६ | १० | ०४ |
| एससीपी | २.०० | ०.३० | ०५ | ०१ |
| ओटिएसपी | २.०० | ०.० | ०५ | ०० |
| **उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम** | | | | |
| सर्वसाधारण | १८.०० | १२.५७ | ४२० | ४१९ |
| एससीपी | ८.०० | ७.९८ | २६७ | २६६ |
| ओटिएसपी | ८.०० | ५.६० | २६७ | १८७ |

(३) हे खरे नाही. वरीलप्रमाणे प्रमाणे निधी प्राप्त आहे.
(४) हे खरे नाही. वरील प्रमाणे निधी प्राप्त आहे. उद्योजकांचे प्रस्ताव बँकेकडे मंजूरीसाठी पाठविण्यात येतात. शाखाधिकारी लाभार्थ्यांशी चर्चा करुनच प्रस्तावास मंजूरी देतात तसेच मंजूर रक्कमेच्या १५ ते २०% मार्जिन मनी या कार्यालयाकडून दिला जातो.

(५) हिंगोली जिल्हयास कृती आराखडयाप्रमाणे कपातीनंतर वरील प्रमाणे निधी प्राप्त झाला आहे. चालु वर्षाकरीता जास्तीत जास्त तरतुद मिळणे करीता जिल्हा नियोजन समितीकडे पाठपुरावा करण्यात येईल. वरील योजने व्यतिरीक्त केंद्र शासनाच्या पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत अनुदानाची रक्कम जास्त असल्यामुळे लाभार्थीचा कल या योजनेकडे जास्त आहे.

---

**रानबाजीरे (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथील सावित्री धरणाच्या बुडीत क्षेत्रात येणाऱ्या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(३८) ११०६१४ (०४-०४-२०१८). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रानबाजीरे (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथे २० वर्षापूर्वी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने बांधलेल्या सावित्री धरणाच्या बुडीत क्षेत्रात रानवडी येथील रस्ता पाण्याखाली गेल्यामुळे सदर ठिकाणी औद्योगिक विकास महामंडळाने पूल बांधून रस्ता तयार करुन दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून मागील १० वर्षापासून सदर रस्त्याच्या दुरूस्तीचे काम केले नसल्यामुळे रस्ता अत्यंत नादुरूस्त झालेला असून वाहतुकीस अतिशय धोकादायक झालेला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे नुतनीकरण न झाल्यास रानवडी, घागरकोंड व बोरावळे या तिन्ही गावांचा संपर्क तुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्त्याचे नुतनीकरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२७-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

सावित्री धरणाच्या उर्ध्व बाजुस ४ कि. मी. अंतरावर सार्वजनिक बांधकाम विभागाचा एक लोखंडी पूल (साकव) धरणातील पाण्याच्या साठयामुळे बुडीत क्षेत्रात गेल्यामुळे महामंडळातर्फे सन १९९९ मध्ये पर्यायी आर. सी. सी. पूल बांधण्यात आला. पूल बांधल्यानंतर पुलापर्यंत जाण्यासाठी तसेच पूलाच्या पुढे मौजे रानवडी गावापर्यंत जाण्यासाठी तत्कालीन आमदार व ग्रामस्थ यांच्या मागणीनुसार व परिस्थितीनुसार महामंडळाने मौजे कापडे उमरठ रस्त्यापासून रानवडी गावापर्यंत एकूण ११५० मीटर लांबीचा डांबरी रस्ता सन २००५ मध्ये बांधलेला आहे. सदर रस्ता महामंडळाच्या क्षेत्राबाहेरचा आहे. परंतु सदर रस्त्याचे काम औद्योगिक धोरण-२०१३ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) हे खरे नाही.

रानवडी, घागरकोंड व बोरावळे या गावांना दळणवळणसाठी पोलादपूर ते चरई मार्ग पर्यायी रस्ता उपलब्ध आहे.
(४) सदर रस्ता औद्योगिक क्षेत्राबाहेरील असल्याने औद्योगिक धोरण २०१३ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धुळे जिल्ह्यात सुविधांयुक्त टेक्सटाईल पार्क उभारण्याबाबत**

**(३९) ११०७३४ (२०-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कापसाचे उत्पादन होणाऱ्या भागात टेक्सटाईल उद्योग उभारण्यात येणार असुन धुळे जिल्ह्यात सर्वसुविधांयुक्त असे टेक्सटाईल पार्क उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे
(३) असल्यास, शासनाने कापूस उत्पादक शेतक-यांच्या समस्या सोडविण्यासाठी कापूस उत्पादन होणाऱ्या भागात टेक्सटाईल पार्क उभारण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२७-०६-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

वस्त्रोद्योग क्षेत्राचा एकात्मिक विकास व्हावा व वस्त्रोद्योग घटकांना सर्व प्रकारच्या मूलभूत सुविधा एकाच संकुलामध्ये उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने केंद्र शासनाने Scheme for Integrated Textile Parks (SITP) ही योजना सन २००६ पासून सूरु केली आहे. केंद्र शासनाकडून वस्त्रोद्योग संकुलांना एकूण प्रकल्प किमतीच्या ४०% किंवा ४० कोटी यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान देण्यात येते. राज्य शासनाच्या दि. २५ मे, २०१२ च्या शासन निर्णयान्वये सदर योजनेंतर्गत प्रकल्प किमतीच्या ९% किंवा ९ कोटी यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान देण्यात येते. धुळे जिल्ह्यामध्ये १) दिशान इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,धुळे २) धुळे इंटिग्रेटेड टेक्सटाईल पार्क, धुळे व ३) श्रीगणेश टेक्सटाईल, धुळे या टेक्सटाईल पार्कना केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे. यापैकी दिशान इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,धुळे या पार्कमध्ये आतापर्यंत १६७६ इतकी रोजगार निर्मिती झालेली आहे व धुळे इंटिग्रेटेड टेक्सटाईल पार्क, धुळे व श्रीगणेश टेक्सटाईल, धुळे या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक वस्त्रोद्योग संकुल योजनेंतर्गत राज्यात १४ वस्त्रोद्योग संकुल स्थापन करण्यात येत असून काही संकुलं कार्यान्वित झाले आहेत. त्याचप्रमाणे राज्यात

शासनाकडून महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महांमडळामार्फत १) नांदगांव पेठ जि.अमरावती २) अति.यवतमाळ जि.यवतमाळ ३) चिखली जि.बुलढाणा ४) माजलगांव जि.बीड ५) कृष्णूर जि.नांदेड ६) मालेगांव जि.नाशिक ७) भालेर जि.नंदूरबार ८) कन्नड जि.औरंगाबाद ९) जामनेर जि.जळगांव व १०) सेलू, जि.परभणी या १० ठिकाणी वस्त्रोद्योग संकुल उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनामार्फत कुष्ठपिडितांना देण्यात येणारे अनुदान वाढविण्याबाबत**

**(४०) ११०९३६ (१९-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनामार्फत कुष्ठपिडितांना दरमहा केवळ ६०० रुपये अनुदान देण्यात येत असून, सदर तुटपुंजे अनुदान वाढविण्याबाबत वारंवार शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार अनुदानात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१३-०६-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) सदर लाभार्थ्यांच्या अनुदानात वाढ करण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.

---

**राज्यातील काही कारखाने १०० ते १५० कि.मी. अंतरावरुन**
**ऊस गाळपासाठी आणत असल्याबाबत**

**(४१) १११७४५ (२०-०४-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कारखान्यांचा सरासरी तोडणी वाहतूक खर्च प्रतिटन ५५२ इतका असून तोडणीचा खर्च सारखा असला तरी काही कारखाने १०० ते १५० कि.मी. अंतरावरुन ऊस गाळपासाठी आणतात त्याचा त्रास जवळच्या ऊस उत्पादकांना होतआहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तोडणी खर्च वाहतूक खर्चात समाविष्ठ करण्याबाबत सदर घटकांची व्याख्या करुन अंतरनिहाय वाहतूकीचे टप्पे पाडून त्या अंतराच्या टप्प्यातील सर्व शेतकऱ्यांना समान दर आकारला जाण्यासाठी डॉ.तोष्णिवाल यांची समिती शासनाने गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नियुक्त केलेल्या डॉ. तोष्णिवाल यांच्या समितीने केलेल्या सर्व शिफारशीची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-०६-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) डॉ.तोष्णिवाल यांच्या समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासंदर्भात दिनांक ८ मार्च, २०१७ अन्वये शासनाने परिपत्रकीय सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत राज्यातील सर्व साखर कारखान्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चोपडा व यावल (जि.जळगांव) तालुक्यातील आदिवासी भागातील अनेक गावे ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत पायाभुत सुविधांपासून वंचित असल्याबाबत**

**(४२) १११९६६ (०४-०४-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा व यावल (जि.जळगांव) तालुक्यातील आदिवासी भागातील अनेक गावे ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत पायाभुत सुविधांपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यांत ओ.टी.एस.पी.साठी २.४८ कोटी रुपये व टी.एस.पी.साठी ३६ लाख रुपयांची अल्प तरतूद करण्यात आल्याने अनेक गावे ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत पायाभुत सुविधांपासून वंचित असल्याने सदर योजनेसाठी पुरेशा निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुसार पुरेशा निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (३०-०६-२०१८) :** (१) व (२) खरे नाही.

राज्यातील ग्रामीण भागातील अनुसूचित क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी क्षेत्र, माडा/मीनीमाडा क्षेत्र, प्रस्तावित माडा/मिनीमाडा क्षेत्र, आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रातील ५० टक्के पेक्षा जास्त आदिवासींची लोक संख्या असलेल्या वस्त्या/पाडे/वाडया/गावांच्या/ महानगरपालिकांच्या /नगरपालिकांचे प्रभाग येथील विकासासाठी आवश्यक असलेल्या सामुहिक विकासाच्या सुविधा पुरविण्यासाठी ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना राबविण्यात येते. त्यानुसार सदर योजनेंतर्गत तेथील आदिवासी लोक संख्येच्या प्रमाणात निधी वितरित करण्यात येतो.

सन २०१७-१८ मध्ये जिल्हा वार्षिक घटक कार्यक्रमांतर्गत ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेसाठी जळगाव जिल्ह्याकरीता आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी (TSP) रु.४८.०० लक्ष व आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्रासाठी (OTSP) रु.३००.०० लक्ष अशी एकूण रु.३४८.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी यावल व चोपडा तालुक्यासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी (TSP ) रु.३०.७६ लक्ष व आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्रासाठी (OTSP) रु.६८.९५ लक्ष अशी एकूण ९९.७१ लक्ष तरतूद करण्यात आली होती.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खेड (जि.पुणे) तालुक्यातील टोकावडे, चिखलगाव व कोहिंडे येथील आश्रमशाळांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४३) ११२६९९ (०४-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यातील (जि.पुणे) टोकावडे, चिखलगाव व कोहिंडे येथील आश्रमशाळांची दुरवस्था झाली असून सुविधांअभावी विद्यार्थ्यांना आंघोळीला नदीवर तसेच शौचास उघड्यावर जावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय

(२) तसेच टोकावडे (ता.खेड,जि.पुणे) येथील आदिवासी आश्रमशाळेमधील गरम पाण्याचे युनिट अनेक महिने बंद असल्याने मुली थंड पाण्याने अंघोळ करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खेड तालुक्यातील आश्रमशाळांची दुरवस्था दूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.२४ ऑक्टोबर, २०१६ रोजी आश्रमशाळांची त्वरित दुरुस्ती करण्याची मागणी शासनाकडे केली असून शासनाने आश्रमशाळांची पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार आश्रमशाळांची दुरवस्था दूर करण्याबाबत व गरम पाण्याचे युनिट सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०६-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) खेड तालुक्यातील (जि.पुणे) टोकावडे, चिखलगाव व कोहिंडे येथे इयत्ता १ ली ते १०वी पर्यंतचे वर्ग भरतात. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहातील विद्यार्थी संख्येनुसार शौचालये, स्नानगृहे व पिण्याचे पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. शाळेच्या इमारती भोवती संरक्षक भिंत पूर्ण आहे. गरम पाण्यासाठी दोन सौर युनिट चालू आहेत. विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी पुरेशा प्रमाणात गरम पाणी उपलब्ध होते. विद्युत पुरवठा बंद झाल्यानंतर जनरेटची सुविधा उपलब्ध आहे. सदर शाळेत पाणी पुरवठा योजना आहे. ४ सोलर हिटर बसविले असून मुलींच्या वसतिगृहामध्ये २ व मुलांच्या वसतिगृहांमध्ये २ सोलर हिटर आहेत. सदर शाळा भाडयाच्या इमारतीमध्ये असल्याने सोलर युनिट बसवण्यास अचडणी येत असल्याने विद्यार्थ्यांची गैरसाय होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी शाळेमध्ये गॅसवर पाणी गरम करुन दिले जाते. प्रकल्प कार्यालय स्तरावरुन आदिवासी विकास निरीक्षक, शिक्षण विस्तार अधिकारी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी हे शाळांना नियमित भेटी देतात व आश्रमशाळांवरील मुलभूत सोयी-सुविधांची पाहणी करीत असतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात मातंग समाजाच्या उन्नतीसाठी आयोगाने केलेल्या शिफारशी लागू करण्याबाबत

**(४४) ११२९५८ (२०-०४-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मातंग समाजाच्या उन्नतीसाठी दिनांक १ ऑगस्ट, २००३ रोजी वा त्यासुमारास अभ्यास आयोगाची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आयोगाचा अहवाल शासनास सन २००८ मध्ये प्राप्त झालेला असून दिनांक ३१ डिसेंबर, २०११ पासून आयोगाने केलेल्या शिफारशी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत शासनाने कोणत्याही आयोगाने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी केली नसल्याने सदर शिफारशींचा लाभ लाभार्थ्यांना झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी अद्यापपर्यंत शासनाने किती निधीची तरतूद केली आहे तसेच याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-०७-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) शासन निर्णय दि.३१ डिसेंबर, २०११ अन्वये क्रांतिवीर लहूजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने शासनास सादर केलेल्या एकूण ८२ शिफारशीपैकी ६८ शिफारशी तत्वत: मान्य करून लागू करण्यात आलेल्या आहेत. मान्य करण्यात आलेल्या शिफारशींचा लाभ लाभार्थ्यांना होण्यासाठी संबंधित विभाग/महामंडळ यांच्याकडून अंमलबजावणी चालू आहे.

(४) शासन निर्णय दि.३१ डिसेंबर, २०११ अन्वये वैयक्तिक लाभाच्या तसेच धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असलेल्या आर्थिक भारांच्या शिफारशींच्या अनुषंगाने संबंधित विभागाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यात कायमस्वरूपी औद्योगिक प्रशिक्षण व व्यापारी केंद्र विकसित करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(४५) ११३६७४ (२०-०४-२०१८). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात कायमस्वरूपी औद्योगिक प्रदर्शन व व्यापारी केंद्र विकसित करण्यासाठी सर्व संबंधित विभागांचे दाखले व जमिनीचे मोजणी नकाशे तयार करून ते मंजुरीसाठी शासनाकडे पाठविण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योग संचालनालयाने याअगोदर देखील औद्योगिक प्रदर्शन व व्यापारी केंद्र विकसित करण्यासाठी विहित नमुन्यातील प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर करून नाशिक औद्योगिक क्षेत्रात उत्पादित होणाऱ्या वस्तूंचे ब्रँडिंग करण्यासाठी, एकाच क्षेत्रातील उद्योगांचे एका ठिकाणी प्रदर्शन भरविण्यासाठी महत्वपूर्ण प्रस्तावास मंजूरी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-०६-२०१८) :** (१) नाही. याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे सादर करण्यात आलेला आहे.

(२) नाही.

(३) कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) लागू नाही.

---

## डहाणू एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत अनुदानित आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळालेले नसल्याबाबत

**(४६) ११४१५८ (१८-०४-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत डहाणू, पालघर, तलासरी, वसई येथील अनुदानित आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांना मागील तीन महिन्यांपासून वेतन मिळालेले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आश्रमशाळेतील कर्मचा-यांचे पगार थकल्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असून यासंदर्भात वरिष्ठांकडे वेळोवेळी कळवूनही कोणतीच दखल घेतली जात नसल्याने कर्मचारी संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,,

(३) असल्यास, कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन न देण्याची कारणे काय आहेत व कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (११-०६-२०१८) :** (१) डहाणू प्रकल्प कार्यालयांतर्गत एकूण २१ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत असून वित्त विभागाचे ७० टक्के पर्यंत निधी खर्च करण्याचे बंधन असल्याने सदर २१ आश्रमशाळांपैकी १० अनुदानित आश्रमशाळांतील १२१ कर्मचाऱ्यांचे माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०१७ या दोन महिन्याचे वेतन विलंबाने झाले, हे खरे आहे.

(२) कर्मचारी संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला होता, हे खरे आहे.

(३) व (४) वित्त विभागाचे ७० टक्के पर्यंतच निधी खर्च करण्याचे बंधन असल्यामुळे तरतुदीअभावी सदर कर्मचाऱ्यांना दोन महिन्यांचे वेतन अदा करण्यात आले नाही. तथापि, तदनंतर वित्त विभागाने १०० टक्के निधी वितरणास मान्यता दिल्याने सर्व आश्रमशाळांच्या कर्मचाऱ्यांचे माहे नोव्हेंबर, २०१७ ते जानेवारी, २०१८ पर्यंतचे वेतन दि.२२.०२.२०१८ रोजी अदा करण्यात आले आहे.

---

**वर्धा जिल्हाकरिता स्वतंत्र आदिवासी एकात्मिक प्रकल्प कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(४७) ११४६४४ (०४-०४-२०१८). डॉ.पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्याकरिता स्वतंत्र आदिवासी एकात्मिक प्रकल्प कार्यालय सुरु करण्याकरिता प्रकल्प अधिकारी व अप्पर आयुक्त आदिवासी विकास विभाग नागपूर तसेच आयुक्त, आदिवासी विभाग, नाशिक यांनी शासनास प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अद्यापपर्यंत वर्धा येथे स्वतंत्र आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्प कार्यालय मंजुर न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (३०-०६-२०१८) : (**१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व ४) नवीन कार्यालय सुरू करण्यासाठी लागणारी नवीन पदे, एकूण आवर्ती खर्च व तेथील कार्यभार याचा विचार करून वर्धा येथे स्वतंत्र एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय सूरू न करता तेथील आदिवासी जनतेच्या सोयीसाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, नागपूर यांच्या अधिनस्त वर्धा येथे सहायक प्रकल्प अधिकारी कार्यालय सुरू करण्यात आले आहे.

---

**भिवंडीत बेकायदा मद्याच्या होत असलेल्या तस्करीबाबत**

**(४८) ११४६८१ (१९-०४-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदेशी मद्याचा साठा हा गोवा व सिल्व्हासाला नेत असल्याचे दाखवून हा मद्याचा साठा भिवंडीत उतरवून घेत असल्याची बाब राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या निदर्शनास येताच त्यांनी हा लाखोंचा साठा जप्त केल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, सदर चौकशीनूसार राज्यात होत असलेल्या बेकायदा मद्याच्या तस्करीबाबत शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०६-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

परंतू सदर जप्त केलेला मद्यसाठा गोवा तसेच सिल्वासा येथे नेत असल्याचे आढळुन आलेले नाही.

(२) दि. १५.०९.२०१७ रोजी भिवंडी-वाडा रोडवर मद्याची बेकायदेशीरपणे वाहतुक करणारा ट्रक क्र. PB ०५ Y ९१४४ मध्ये विविध ब्रँडचे १२८० बॉक्स जप्त केले. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत रु.१,०५,०२,६००/- इतकी आहे. याबाबत संबधितांविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत गुन्हा र. क्र. ३६४/२०१७ भपमरा नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच दि. ५.०१.२०१८ रोजी मौजे काल्हेर जय मातादी कम्पाउंड, काल्हेर गाव भिवंडी ता. भिवंडी जि. ठाणे येथे मद्याचा बेकायदेशीर साठा आढळुन आला. याबाबत संबधितांविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत गुन्हा र.क्र.१/२०१८ निरिक्षक भरारी पथक क्र.२ कडून नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणात एकुण १,६०,५०,२७५/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी ४ आरोपींना अटक करण्यात आली असून, दोन आरोपींचा अटकपुर्व जामीन मा. न्यायालायाने मंजूर केला आहे. तर एक आरोपी फ़रार आहे.

(३) मद्याची तस्करी रोखण्याकरिता सीमा तपासणी नाके अद्यावत करणे, सामुहीक धाडसत्र आयोजीत करणे, रात्रीची गस्त घालणे, टोल नाक्यावर तसेच अचानक संशयित वाहने तपासणे इ. कामकाज व मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ कलम ९३ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते. तक्रारीसाठी टोल फ्री व व्हॉट्स ॲप क्रमांक प्रसिद्ध केला आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील साखरेचे दर कमी झाल्याने एफआरपी न देणाऱ्या ४२ कारखान्यांना नोटीसा दिल्याबाबत

**(४९) ११५५७० (१९-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखरेचे कमी झालेले दर आणि दुसरीकडे ऊस उत्पादकांना द्यावा लागणारा वाजवी दर (एफआरपी) अशा दुहेरी अडचणीत राज्यातील साखर कारखाने सापडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपीनुसार उचल देणे, कायद्याने बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास राज्य साखर आयुक्त कार्यालयातून संबंधित साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची देणी तातडीने द्यावीत अशा प्रकारच्या नोटीसा पाठविल्या असल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२४-०५-२०१८) :** (१) होय.

सन २०१७-१८ च्या गळीत हंगामाचे सुरुवातीस साखरेचे सरासरी दर प्रतिक्विंटल रु.३६००/- पर्यंत होते. परंतु सध्या सदर दर रु.२६००/- पर्यंत घसरलेले आहेत. देशातील साखरेच्या किंमतीस अनुसरुन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने साखरेचे मुल्यांकन/उचल दर कमी केले असल्याने FRP देण्यासाठी साखरेवर रु.१८८५/- प्रतिपोते इतकी उचल मिळत असल्यामुळे सद्या कारखान्यांना मधील फरकाची रक्कम उपलब्ध करण्यासाठी अडचणी येत आहेत.

केंद्र शासनाने दि.०१/०६/२०१७ च्या अधिसुचनेनुसार हंगाम २०१७-१८ साठी ऊसाला ९.५०% उताऱ्यासाठी रु.२५५०/- प्रतिटन व त्यापुढील १% उताऱ्यासाठी रु.२६८/- याप्रमाणे FRP दर जाहीर केलेला आहे. सदर दराप्रमाणे ऊसदर देणे कारखान्यांना बंधनकारक आहे. कायद्यानुसार १४ दिवसांत ऊस उत्पादकांस पैसे न दिल्यास १५% व्याज देण्याची तरतूद आहे.

उक्त तरतुदीनुसार एफआरपी देणे व घसरलेले साखर दर या दुहेरी अडचणीत राज्यातील साखर कारखाने सापडले आहेत.

(२) होय.

ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ मधील कलम ३(३) च्या तरतुदीनुसार विहीत मुदतीत एफआरपी अदा करणे कारखान्यांना बंधनकारक आहे.

(३) होय.

(४) हंगाम २०१७-१८ मधील गाळप केलेल्या ऊसाचे थकीत एफआरपी देयके तातडीने ऊस पुरवठादारांना अदा करावीत यांसदर्भात ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ मधील कलम ३(३) च्या तरतुदीन्वये दि.०८/०२/२०१८ अन्वये २१ कारखान्यांना, दि.०९/०२/२०१८ अन्वये ११६ कारखान्यांना नोटीसा बजावण्यात आल्या. त्यानुसार सदर कारखान्यांच्या सुनावण्या अनुक्रमे दि.१४/०२/२०१८ व १५/०२/२०१८ रोजी साखर आयुक्तालयात घेण्यात आलेल्या आहेत. आतापर्यंत ६ कारखान्याविरुध्द RRC कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नंदूरबार आदिवासी आदिवासी प्रकल्प कार्यालयाने निधीत गैरव्यवहार केल्याबाबत

**(५०) ११५७२३ (१८-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदूरबार जिल्हयात आदिवासी विकास विभागाने आदिवासी लाभार्थ्यांच्या शेतजमिनीवर नवीन विहीर खोदून विद्युत तेलपंप व पाईप देण्याची योजना राबविली असून त्यानुसार आदिवासी प्रकल्प कार्यालयाने लाभार्थी निवडले मात्र अधिका-यांनी योजना कागदावरच राबवून सुमारे साडेतीन कोटींपेक्षा अधिक निधीत गैरव्यवहार केल्याप्रकरणी संबंधित अधिका-यांना अटक करुन कारवाई सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणातील आदिवासी लाभार्थ्यांना दोन वर्षे उलटूनही अदयाप विहिरींचा लाभ देण्यात आलेला नाही त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन लाभार्थ्यांना लाभ मिळण्यासाठी व गैरव्यवहार करणा-या अधिका-यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२४-०५-२०१८) :** (१) होय हे खरे आहे,
(२), (३) व (४) होय हे खरे आहे, प्रस्तुत प्रकरणी संबंधितावर गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरचे प्रकरण हे न्यायप्रविष्ठ आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.